**कृपया प्रसिध्दीसाठी -** **25 सप्टेंबर 2013**

**श्री.राम नाईक, भाजपा नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री यांनी 25 सप्टेंबर 2013 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन**

## *राम नाईक लोकसभा निवडणूक लढणार नाहीत*

**मुंबई, बुधवार:** ''देशात आगामी लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. मी माझ्या राजकीय कारकिर्दीचे सिंहावलोकन केले. प्रथम भारतीय जनसंघ व 1980 पासून भारतीय जनता पार्टीसाठी अर्ध शतकाहून अधिक काळ प्रत्येक निवडणुकीत मी झोकून देऊन काम केले. गेल्या 35 वर्षात तर स्वतः दहा निवडणुका लढविल्या. या प्रदीर्घ अनुभवाचा पक्षाला उपयोग करून द्यायचा, मात्र स्वत: यापुढे लोकसभेची निवडणूक लढायची नाही असा निर्णय मी घेतला आहे. हे आयुष्य समाजासाठी आहे या भावनेने मी आजवर जगलो. याच भावनेतून हा निर्णयही वैयक्तिक असला तरीही जाहीर करीत आहे'',अशी घोषणा भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री राम नाईक यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेमध्ये केली. श्री राम नाईक यांचे राजकीय जीवनातील प्रेरणास्थान, एकात्म मानववादाचे जनक पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीचे औचित्य साधून श्री. नाईक यांनी हा निर्णय जाहीर केला.

गेल्या 53 वर्षांच्या आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीचा थोडक्यात आढावा घेताना श्री. नाईक म्हणाले,''हजारो तरुणांप्रमाणे मीही पदवी मिळाल्यानंतर नोकरीच्या शोधात 1954 मध्ये मुंबईत आलो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम मुंबईतही सुरुच ठेवले. त्यातूनच 1960 पासून भारतीय जनसंघाच्या कामाला सुरुवात झाली. 1978 मध्ये बोरीवली विधानसभा मतदार संघातून मी आयुष्यातली पहिली निवडणूक लढलो. सर्वाधिक मते मिळवून मी आमदार झालो. त्यानंतर सलग तीनदा आमदार झालो. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर मुंबईतून सलग तीनवेळा निवडून येणारा मी पहिला आमदार होतो. बोरीवली-दहिसरच्या मतदारांनी नेहमीच माझ्यावर प्रचंड प्रेम केले. त्यामुळेच हा विक्रम मी प्रस्थापित करु शकलो. त्यानंतर 1989 मध्ये पहिल्यांदा लोकसभा निवडणूक लढवून मी खासदार बनलो. उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघानेही मला सतत साथ दिली. सलग पाचवेळा मी खासदार म्हणून निवडून आलो. 1999 च्या निवडणुकीत महाराष्ट्रातून सर्वाधिक 5,17,941 मते मिळवून मी विजयी झालो. स.का.पाटील, कॉम्रेड डांगे, जॉर्ज फर्नांडिस, मनोहर जोशी, मृणाल गोरे असे अनेक दिग्गज नेते मुंबईने लोकसभेत पाठविले. मात्र मुंबईतून सलग पाचवेळा लोकसभेवर निवडून जाण्याचा विक्रम प्रस्थापित करण्याचे भाग्य मलाच लाभले. पुढे दोन पराभवही पचवावे लागले, तरीही हा विक्रम आजवर कोणाही खासदाराला मोडता आलेला नाही. उत्तर मुंबईतील मतदार, कार्यकर्ते व सहकारी यांच्या प्रेमामुळेच हे घडले हे यावेळी कृतज्ञतापूर्वक मला नमूद केलेच पाहिले.''

श्री. राम नाईक पुढे म्हणाले, ''1978 पासून जनप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना प्रतिवर्षी मतदारांना केलेल्या कामाचा अहवाल सादर करण्याची पद्धत मी अवलंबिली. कै.रामभाऊ म्हाळगी यांनी सुरु केलेल्या या परंपरेचे मी कर्मठतेने पालन केल्याने मतदारांचा विश्वास मिळवू शकलो. आमदार असताना मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणा-या समस्या लक्षात घेऊन आमदार निधीतून दुमजली संडास, फिरते संडास, कूपनलिका असे अनेक अभिनव प्रयोग केले. ते यशस्वी झाले. पुढे खासदार झाल्यानंतर संसदेत 'वंदे मातरम्' गाण्याची प्रथा सुरु करण्यापासून, 'बॉम्बे', 'बम्बई'चे 'मुंबई', खासदार निधी सुरु करणे, शिशुआहार जाहिरातींवर बंदी व स्तनपान प्रोत्साहन विधेयक अशी अनेक ऐतिहासिक कामेही माझ्या हातून घडली. 1995-96 मध्ये अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणा-या लोकलेखा समितीचे अध्यक्षपदही मी भूषविले.''

श्री. अटल बिहारी वाजपेयी यांच्याबद्दल विशेष कृतज्ञता व्यक्त करुन श्री. राम नाईक म्हणाले,‘‘1998 च्या वाजपेयी मंत्रीमंडळात राज्यमंत्री म्हणून माझा समावेश झाला. मा. अटलजींनी रेल्वे (स्वतंत्र प्रभार), गृह, नियोजन, कार्यक्रम अंमलबजावणी व संसदीय कामकाज अशा पाच महत्त्वाच्या खात्यांचे काम सोपविले. या काळात मुंबई रेल्वे विकास प्राधिकरणाची स्थापना करुन रु. 3,450 कोटींचे प्रकल्प मंजूर केले तर दादरा-नगरहवेली मुक्ति संग्रामात सहभागी झालेल्यांना ‘स्वातंत्र्यसैनिक’ म्हणून बहुमान देण्याचे काम करु शकलो याबद्दल मी विशेष समाधानी आहे.’’ त्यानंतर मा. अटलजींनी पुढील मंत्री मंडळात पेट्रोलियमसारख्या अत्यंत संवेदनशील व महत्त्वाच्या खात्याच्या कॅबिनेट मंत्रीपदाची जबाबदारी श्री. नाईक यांच्यावर सोपविली. 1963 मध्ये स्वतंत्र पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय स्थापन झाले. तेव्हापासून आजतागायत 50 वर्षात लोकसभेच्या संपूर्ण कालावधीसाठी 5 वर्षे पेट्रोलियम मंत्रीपदी असणारे श्री. नाईक हे एकमेव मंत्री आहेत. एक कोटी दहा लाख ग्राहकांची घरगुती गॅससाठीची प्रतिक्षा सूची संपवून त्यांच्यासह 3.50 कोटी नव्या गॅस जोडण्या श्री. नाईक यांनी दिल्या. मुंबईत तर पाईप गॅसचे जे जाळे आता निर्माण झाले आहे त्याचे श्रेयही त्यांनाच जाते. कारगिल लढाईतील हुतात्म्यांच्या कुटुंबियांना पेट्रोल पंप, गॅस एजन्सी दिल्या. भारताच्या पेट्रोलियम इतिहासात इथेनॉल मिश्रित पेट्रोल वापरास प्रारंभ करण्याबद्दल तसेच प्रथमच परदेशात कच्चे तेल व नैसर्गिक वायू यांचे साठे शोधून काढण्यासाठी भांडवली गुंतवणूक करुन उत्पादनास प्रारंभ करण्याचे श्रेय निर्विवादपणे श्री. राम नाईक यांनाच दिले जाते.

संसदीय क्षेत्रात प्रभावी काम करीत असतानाच सातत्याने भारतीय जनसंघ व भारतीय जनता पार्टीमध्ये विविध संघटनात्मक जबाबदा-या श्री. राम नाईक यांच्यावर सोपविण्यात आल्या. जनसंघ काळात ते मुंबईत पूर्ण वेळ कार्यकर्ता-संघटन मंत्री होते, तर भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेनंतर प्रदीर्घ काळ त्यांनी मुंबईचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. भाजपा स्थापनेपासून ते केंद्रिय कार्यकारिणीचे सदस्य आहेत. याशिवाय भाजपाच्या सुशासन प्रकोष्ठाचे ते राष्ट्रीय संयोजक आहेत.

मूळ राजकीय कार्यकर्त्याचा पिंड असलेले श्री. राम नाईक सामाजिकदृष्ट्या उपेक्षितांसाठी काम करीत असतात. आमदार असताना बोरीवलीतील रेल्वे हमालांची तसेच कुष्ठपीडितांची संघटना उभारण्यापासून अनेकांना श्री. नाईक मदत करण्यात अग्रेसर राहिले आहेत. सध्या तारापूर अणु ऊर्जा प्रकल्पपीडितांच्या पुनर्वसनासाठी मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रवीष्ट खटल्यात ते सहभागी झाले आहेत, तर कुष्ठपीडितांसाठी काम करणा-या जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या ‘आंतरराष्ट्रीय कुष्ठ निवारण संस्था’ या कै. डॉ. शरद्‌चंद्र गोखले यांनी स्थापन केलेल्या संघटनेचे ते आता अध्यक्ष आहेत.

‘‘आजवर केलेल्या कामाचे समाधान आहे. 1994 मध्ये कर्करोगाशी सामना करून बरा झालो ते पुढील आयुष्य समाजसेवेसाठी या भावनेमुळेच. आता वय 80 असले तरी अजुनही शरीर व मन थकलेले नाही. त्यामुळे यापुढेही मी भाजपाचे काम करीतच राहाणार आहे. मात्र लोकसभा निवडणूक लढविणार नाही. माझा हा निर्णय मतदार, कार्यकर्ते, सहकारी मान्य करून मला साथ देतील याचा मला विश्वास आहे. माझ्या संपूर्ण राजकीय वाटचालीत या सर्वांप्रमाणेच प्रसिद्धी माध्यमांनीही मला नेहमीच सहकार्य केले. ‘मी असे बोललोच नाही किंवा माझ्या म्हणण्याचा विपर्यास केला गेला’ असे सांगण्याची वेळ माझ्यावर कधीही आली नाही. या सर्वांबद्दल वाटणारी कृतज्ञताही मी या निमित्ताने व्यक्त करु इच्छितो’’, असेही श्री राम नाईक शेवटी म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**